## थोडक्यात...

### साईकृपा क. महाविद्यालयाची निकालात बाजी; यशाची परंपरा कायम

**(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)**

**बोरी -** साईकृपा कनिष्ठ महाविद्यालयाने बारावीच्या परीक्षेत आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयाने ९१% निकालाची नोंद करत यशाचे शिखर गाठले आहे. विशेष म्हणजे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले महाविद्यालयातील एकूण ४२ विद्यार्थी परीक्षेस बसले असता चांगल्या प्रकारे गुण मिळवून त्यापैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच प्रथम शेख समरीन शरीफ ६५.६७%, द्वितीय घाटूळ पुनम विकास ६१.५०%,तृतीय डोंबे गायत्री ज्ञानदेव ६१.३३% असे मार्क्स मिळवत या विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम ठेवली त्यामुळे या यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.श्री अशोकरावजी चौधरी,सचिव जि.प सदस्य अजय भैय्या चौधरी व मुख्याध्यापिका अश्विनीताई चौधरी शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### राष्ट्र उभारणीत शिक्षण अत्यंत महत्त्वाचे:श्री प्रकाश पोतदार

**(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)**

**बोरी**-विद्याभारतीच्या आचार्य प्रांत प्रशिक्षण वर्गास प्रारंभ परभणी: विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान दिल्लीशी सलग्न विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्था आयोजित परभणी शाखेच्या वतीने दहा दिवसीय शिशु वाटिका आचार्य प्रांत प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन राजे संभाजी गुरुकुल गंगाखेड रोड परभणी येथे दि.३ रविवार रोजी झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करून झाली. याप्रसंगी विद्याभारती देवगिरी प्रांत चे उपाध्यक्ष श्री प्रकाश पोतदार यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्र उभारणीत शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन यावेळी श्री पोतदार यांनी केले. विद्याभारती हे जगातील शिक्षण क्षेत्रात काम करणारे असरकारी परंतु असर-कारी असे संघटन असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. नराचा नारायण पर्यंत तर नारी तू नारायणी तसेच बालकाचा देवत्वापर्यंत प्रवासासाठी सा विद्या या विमुक्तये असे ब्रीद घेऊन विद्याभारती शिक्षण क्षेत्रात काम करीत आहे. शिक्षण क्षेत्रात भारतीयत्व हे वैशिष्ट्य घेऊन विद्याभारती काम करते. विद्याभारती देशातील सर्वच प्रांतामध्ये काम करते. आज देशभरात विद्याभारतीच्या पंचवीस हजार शाळा आणि त्या शाळेमधून एक लाख २५हजार शिक्षक तर सात लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशी माहिती त्यांनी दिली. विद्याभारती हे १९५२ मध्ये कुरुक्षेत्र येथे प्रारंभ होऊन आज हे संघटन देशभर काम करीत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याभारती देवगिरी प्रांत चे अध्यक्ष डॉ. विवेक काटदरे हे होते. दि. १३ मे पर्यंत हे प्रशिक्षण राजे संभाजी गुरुकुल गंगाखेड रोड, परभणी येथे चालणार आहे. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी विद्याभारती शाखा परभणीचे जिल्हाध्यक्ष श्री सुभाष चलवदे, जिल्हा मंत्री श्री शिरीष संघई, श्री प्रताप देशपांडे, श्री.शिवाजी आरळकर,श्री. अभय हट्टेकर, श्री चंद्रशेखर कुलकर्णी, श्री विकास येस्के, श्री संतोष चिद्रवार, श्री प्रशांत डाफणे, श्री गणेश लोखंडे, सौ. अभिलाषा संघई आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# संभाजी सेनेचे लातूर महापालिकेसमोर तीव्र निदर्शने मागणी न मानल्यास ढोल बजाव आंदोलनाचा इशारा




**(मनोज पाटील/दै.धर्मयोध्दा)**

**लातुर -** शहरातील औसा रोडवरील वाडा हॉटेल परिसरातील चौकाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देऊन त्या ठिकाणी भव्य पुतळा उभारावा, या मागणीसाठी संभाजी सेनेच्या वतीने आज लातूर महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. शहरातील महत्त्वाच्या चौकांना महापुरुषांची नावे देण्याच्या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर ही मागणी सातत्याने लावून धरली जात आहे. संभाजी सेनेच्या वतीने दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी महापालिकेच्या आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते. त्या वेळीच दिनांक ४ मे रोजी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे आज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी महापालिकेसमोर जोरदार निदर्शने करत आपला रोष व्यक्त केला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, औसा रोडवरील सदर चौक हा शहरातील प्रमुख आणि वर्दळीचा भाग असून, अनेक वर्षांपासून या चौकाचे 'छत्रपती संभाजी महाराज चौक' असे नामकरण करून त्यांच्या स्मरणार्थ भव्य पुतळा उभारण्याची मागणी होत आहे. मात्र, प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. यावेळी संभाजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर माने यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले. प्रशासनाने येत्या १० मे २०२६ पर्यंत ही मागणी पूर्ण करावी, अन्यथा ११ मे रोजी महापालिकेसमोर ढोल बजाव आंदोलन छेडण्यात येईल, असा तीव्र इशारा देण्यात आला यावेळी उपस्थित संभाजी सेने चे संस्थापक अध्यक्ष सुधाकरराव माने साहेब, प्रदेश प्रवक्ते राजकुमार साळुंखे, मराठवाडा उपाध्यक्ष मनोज पाटील सर, जिल्हा संपर्कप्रमुख धर्मराज पवार, जिल्हाध्यक्ष योगेश देशमुख, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मदन बोडके, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष अमोल कांदे, विद्यार्थी आघाडी जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद पवार, जिल्हा संघटक सिद्धाजी माने, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत माने, ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष अंकुश बिराजदार, सुधाकर सोनवणे, विलास लंगर,विद्यार्थी आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष हनुमंत बारलेकर, विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष रितेश चव्हाण, विद्यार्थी आघाडी शहर अध्यक्ष वैभव विभुते, रेनापुर तालुकाध्यक्ष सुरेश चव्हाण, रेनापुर तालुका कार्याध्यक्ष एकनाथ काळे, निलंगा तालुका अध्यक्ष बबन राजे, विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष रेनापुर बबलू शिंदे, विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष औसा अक्षय पवार, औसा शहर प्रमुख गणेश तिडके, औसा तालुका अध्यक्ष मोहन तात्या माळी, रेनापुर शहराध्यक्ष अलीम पठाण, लातूर तालुकाध्यक्ष उमाकांत वायाळ, लातूर तालुकाध्यक्ष विद्यार्थी आघाडी निखिल जगताप, ऑटो युनियन शहराध्यक्ष सचिन मळगे, ऑटो युनियन जिल्हा उपाध्यक्ष मकांत पांढरे, किसन गडगळे, शिवाजी खटाळ, विशाल मगर, कैलास कांबळे, कैलास सावंत, महादेव मोरे, मल्हारी देडे, आदिनाथ पवार, मनोज माळी, रोहन दौंड,नागेश धविले.प्रशांत थोरात गणेश शिंदेइत्यादी अनेक पदाधिकारी उपस्थित होते

## झरी ग्रामपंचायतीचा पुढाकार : रोड दुभाजकावरील झाडांना टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा




**(गजानन चव्हाण/दै.धर्मयोध्दा)**

**झरी -** पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने झरी ग्रामपंचायतीच्या वतीने रस्त्याच्या दुभाजकावर लावण्यात आलेल्या झाडांची योग्य निगा राखण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत टँकरच्या माध्यमातून झाडांना नियमितपणे पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्राम पंचायतीच्या कर्मचाऱ्यांकडून दुभाजकावरील फुलझाडे व इतर रोपांना नळाद्वारे पाणी दिले जात असून, उन्हाळ्याच्या कडक तापमानातही झाडे तग धरून राहावीत यासाठी ही उपाययोजना करण्यात येत आहे. विशेषतः सध्या वाढत्या उष्णतेमुळे झाडांचे संरक्षण करणे आवश्यक बनले आहे. या उपक्रमामुळे रस्त्याच्या दुभाजकावर हरित पट्टा निर्माण होत असून, परिसराचे सौंदर्य वाढण्यास मदत होत आहे. तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी ग्रामपंचायतीचा हा प्रयत्न कौतुकास्पद मानला जात आहे. स्थानिक नागरिकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत असून, झाडांचे संगोपन करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायतीकडून करण्यात आले आहे.

## आदिती उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी निकाल ९९ टक्के





**(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)**

**जिंतुर -** तालुक्यातील कुऱ्हाडी येथील स्वर्गीय राधाबाई वाहुळे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेअंतर्गत चालणाऱ्या आदिती कला, वाणिज्य व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावीचा निकाल यंदा ९९ टक्के इतका लागला आहे. उत्कृष्ट निकालामुळे विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता कायम राखल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. विज्ञान शाखेत सय्यद अब्दुल सय्यद इब्राहिम याने ९० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. ओम चव्हाण (८६ टक्के) व भार्गव रणधीर शोभणे (८३ टक्के) यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक मिळवले. कला शाखेत अभिषेक रंगनाथ राठोड (७२ टक्के) प्रथम ठरला असून श्रद्धा नामदेव लाखाडे (७० टक्के) व कृष्णा ज्ञानेश्वर इंजे (६९ टक्के) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. वाणिज्य शाखेत नितीन तुकाराम खंदारे याने ६९ टक्के गुण मिळवत आघाडी घेतली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण वाहुळे, प्राचार्य राहुल वाहुळे, प्रा. खुशाल घनसावद, प्रा. अरुण आवचार, प्रा. मुरलीधर पवार, प्रा. भारती शेजावळे, प्रा. पिंटू वाघ तसेच सचिन इजे, शेषराव इंजे आदींनी अभिनंदन केले. विद्यालयाच्या या यशाबद्दल परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

## वाढत्या तापमानाने नागरिक हैराण

**परभणी :** देशात वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक शहरांमध्ये तापमान ४० अंशांच्या वर गेले असून उष्णतेची लाट तीव्र होत आहे. हवामान विभागाने नागरिकांना दुपारी बाहेर पडणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. पाण्याचे सेवन वाढवून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शेतातील तारांना वीज प्रवाह; शेतकऱ्याच्या ज्वारी पिकाचे मोठे नुकसान, नुकसान भरपाईची मागणी




**(गजानन चव्हाण/दै.धर्मयोध्दा)**

**परभणी -** तालुक्यातील झरी परिसरातील एका शेतकऱ्याने महावितरण विभागाकडे निवेदन देत आपल्या ज्वारी पिकाचे नुकसान झाल्याची तक्रार केली आहे. संबंधित शेतात लावण्यात आलेल्या तारांमध्ये वीज प्रवाह सोडण्यात आल्यामुळे ज्वारी पिकाला आग लागून मोठे नुकसान झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकरी पद्माकर अनंतराव चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, गट क्रमांक १२० मधील त्यांच्या शेतात लावलेल्या तारांमध्ये अचानक वीज प्रवाह सोडण्यात आल्याने ऊस जळून खाक झाला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून पिक पूर्णतः नष्ट झाले आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा करून परिस्थितीचा आढावा घ्यावा व नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचीही विनंती करण्यात आली असून तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांमध्येही चिंता व्यक्त केली जात असून प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## अपदा प्रबंधक सुचना प्रणाली तयार करण्याच्या प्रक्रियेत - साक्षी मसलेकरचा समावेश



**(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)**

**बीड -** माजलगाव तालुक्यातील गंगामसला गावची रहिवाशी व सेलू येथील पत्रकार श्रीपाद भास्करराव मसलेकर यांची कन्या साक्षी मसलेकर हिने केंद्र सरकारच्या गृह मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय अपदा प्रबंधन मोबाईल वर आधारित आपत्कालिन सुचना प्रणालीची नुकतीच यशस्वी चाचणी घेण्यात आली देशातील नागरीकांना आपत्कालिन परस्थितीची माहीती अगोदरच कळण्यासाठी ही प्रणाली कार्यरत्नवत झाली आहे त्या मुळे येणाऱ्या आपत्कालिन संकटा पासून प्रत्येकास अगोदरच माहिती मिळाल्या मूळे सुरक्षिततेसाठी दक्ष राहता येईल ही संपुर्ण प्रणाली भारतीय बनावटीची असून केंद्र शासनाच्या सी - डॉट कंपनीने २०२३ पासून अपदा प्रणाली विकसीत करण्याचे कार्य हाती घेतले होते मुख्य कार्यकारी अधिकारी राज कुमार ऊपाध्याय डॉ . पंकज कुमार दलैला यांचे मार्ग दर्शना खाली गंगामसला येथील साक्षीश्रीपाद मसलेकर यांचा या प्रणाली तयार करण्याच्या कार्यात मोठा सहभाग होता महाराष्ट्र दिनाच्या दिवशी १ मे ला या अपदा प्रणालीची यशस्वी चाचणी घेण्यात आली त्या तील महत्वपुर्ण सहभागातील कामगिरीने साक्षी मसलेकर यांनी गंगामसल्या या ग्रामीण भागाचे नाव देशपातळीवर यशस्वी केले आहे या बद्दल गंगामसले येथील रहिवाशी तथा माजी सभापती सतिषराव सोळंके व अन्य प्रतिष्ठीत नागरीकांनी अभिनंदन केले आहे

## प्रत्येकाला उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची उभारणी करणार -श्री सोमेश्वरानंद सरस्वती



**(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)**

**सोनपेठ-** श्रीक्षेत्र डिघोळ येथे श्रीराम शक्तिपीठ संस्थानाच्या चैतन्य हनुमान मंदिराचे भुमीपुजन सोहळ्यात पीठाधीश्वर श्री सोमेश्वरानंद सरस्वती यांनी डिघोळ परीसरात सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची स्थापना करण्याचा संकल्प बोलुन दाखवला आहे त्र्यंबकेश्वर येथील श्रीराम शक्तिपीठ संस्थान पीठाधीश्वर राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज (पंचायती अखाडा श्री निरंजनी) यांच्या प्रमुख उपस्थितीत व आशिर्वादाने शुक्रवार दिनांक १मे २०२६ रोजी डिघोळ येथे चैतन्य हनुमान मंदिर भूमिपूजन व श्रीराम शक्तिपीठ संस्थानाची स्थापना मोठया उत्साहात पार पडला याप्रसंगी राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज (पंचायती अखाडा श्री निरंजनी) यांनी दिला मानवतेचा संदेश देवुन भविष्यात श्रीराम शक्तिपीठ संस्थानाकडून शाळा व भविष्यात तरुणपिढी चांगल्या मार्गावर वाटचाल करावी, व्यसनापासून दुर व्हावी, तरूणतरुणी शिक्षण घ्यावे, जातिवाद,भेदाभेद,भेदभाव करू नका हा संदेश त्यांनी ग्रामस्थांना दिला.यावेळी त्यांनी डिघोळ परीसरात सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची स्थापना करण्याचा संकल्प बोलुन दाखवला या सोहळ्या प्रसंगी भाजपा अध्यात्मिक समन्वय आघाडी जिलाध्यक्ष महन्त सिद्धेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त श्रीनाथानन्द सरस्वतीजी महाराज (श्रीराम शक्तिपीठ संस्थान) महन्त सुदर्शनानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त रामानन्द सरस्वतीजी महाराज, महन्त विश्वेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त शिवानन्द सरस्वतीजी महाराज, महन्त हंसानन्द सरस्वतीजी महाराज,डिघोळ उपसंरपच अजय देशमुख, सुधीर बिंदू मा.श्री.कृष्णाजी पिंगळे साहेब त्र्यंबकेश्वर येथील बापू पेंडोळे गुरूजी, प्रविण देशमुख गुरूजी, वैजनाथ शिंदे मारुतीराव रंजवे. गणेश मुळे कुमार चव्हाण, वैभव खंदारे गोकुळ आरबाड , रविंद्र(महाराज)नंन्नवरे, हिरामण ढगे , नाशिक येथील श्रीराम शक्तिपीठ संस्थानाचे मोठया संख्येने साधक मंडळी उपस्थित होते गोपीनाथ जाधव चव्हाण,अनंता शिंगाडे तसेच मोठया संख्येने ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

## कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाचा बारावी निकालात डंका; विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के!

**(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)**

**सोनपेठ-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल आज, २ मे रोजी जाहीर झाला. या निकालात सोनपेठ येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाने आपली देदीप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के (१००%) लागला असून, कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश संपादन केले आहे. शाखानिहाय गुणवंतांची भरारी बारावीच्या या निकालात तिन्ही शाखांमधील प्रथम तीन क्रमांक पटकावणारे विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत: विज्ञान शाखा: १. उबाळे खुशीश्री अशोक (प्रथम) २. कसबकर संध्या नागेश (द्वितीय) ३. स्वामी आकांक्षा रवी (तृतीय) कला शाखा १. कदम सरस्वती हनुमान (प्रथम) २. रंजवे आदित्य संभाजी (द्वितीय) ३. कांबळे आदेश मुंजा (तृतीय) वाणिज्य शाखा: १. मोरे ऋषिकेश प्रवीण (प्रथम) २. नवले स्वराज श्रीराम (द्वितीय) ३. माने वैशाली रमेश (तृतीय) यावेळी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. परमेश्वर रावजी कदम साहेब यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे विशेष अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेख शकीला व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे सोनपेठ शहर व परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao